# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com

वेब साईट क्रमांक www.dydepune.com


जा.क्र.उमाशि-२/११ वी ऑन.प्रवेश/पुवि/२०१४| १४९०१

दिनांक : २७/६/२०१४

27 JUN 2014

प्रति

सर्व झोनप्रमूख /झोन सहाय्यक
पर्यवेक्षिय अधिकारी ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया,
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय :- इयत्ता अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१४-१५
प्रवेशाच्या कालावधीतील तक्रारींचे निवारण

उपरोक्त विषयान्वये संबंधीतांनी आपल्या झोनमधील प्रवेशासंदर्भात ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त होतील त्या संदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. संबंधित विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने मार्गदर्शन करावे.

१. गुणवत्ता यादी जाहिर झाल्यानंतर आपल्या शाळा कॉलेजची कटऑफ लिस्ट वेबसाईटवरुन (http://pune.fyjc.org.in) काढून त्याची हार्ड कॉपी स्वत:कडे ठेवावी. विद्यार्थ्यांकडील तक्रारी नुसार कटऑफ लिस्ट पाहून त्यांना उचित मागदर्शन करावे.

२. ज्या विद्यार्थ्यांचे पहिल्या किंवा दुस-या यादीत त्यांच्या पसंतीक्रम, कॉलेज कटऑफ व त्यांचे गुण यामुळे नांव न आल्यास त्याचे कारण त्यांना समजावून सांगण्यात यावे.

३. ज्या मुलांना प्रवेश नाकारले जातील अशी मुले आपल्याकडे आल्यास त्यांची माहिती घेऊन उचित मार्गदर्शन माहिती पुस्तिकेतील नियमानुसार करण्यात यावे.

४. आपल्या झोन मधील आयटी शिक्षकांची मदत घेवून तांत्रिक अडचणीबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

५. ज्या विद्यार्थ्यांनी फार्म पूर्ण भरलेले नाहीत व त्यांचा फॉर्म ऑनलाईन मध्ये समाविष्ठ झाला नाही अशा विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर कॉलेज मध्ये रिक्त असणा-या जागेवर परस्पर अर्ज करण्यास सांगण्यात यावे.

उपरोक्त सूचनांचा अवलंब करुन तक्रारींचे निवारण करावे. सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १